This Question Paper consists of **37** questions and **15** printed pages.

ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण **37** प्रश्न आणि **15** छापील पाने आहेत.

Roll No.
अनुक्रमांक

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

**9070**

# MARATHI
## (मराठी)
## (204)

**Code No.** **70/S/O/M**
**कोड नं.**

**SET/सेट** **A**

Day and Date of Examination ..................................................................
(परीक्षेचा दिवस आणि तारीख)

Signature of Invigilators 1. .........................................
(निरीक्षकाची सही)

2. .........................................

UNNATI
EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR

**सामान्य अनुदेश :**

1. सर्व प्रश्नांचे उत्तर तुम्हाला दिलेल्या उत्तर-पुस्तिकेतच लिहायची आहेत.
2. या प्रश्न-पत्रिकेला वाचण्यासाठी **15** मिनिटाचा वेळ दिला गेला आहे. प्रश्न-पत्रिकेचे वितरण दुपारी **02.15** वाजता करण्यात येईल. **02.15** ते **02.30** पर्यंत विद्यार्थी केवळ प्रश्न-पत्रिका वाचतील आणि या वेळेत उत्तर-पुस्तिकेत कोणतेही उत्तर लिहणार नाहीत.
3. परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.
4. कृपाकरून प्रश्न-पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रूपात असावी.
5. बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायांतून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर-पुस्तिकांमध्ये योग्य उत्तर लिहायचे आहे.
6. बहुपर्यायी प्रश्नांच्या सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.
7. उत्तर-पत्रिकेत ओळख निर्दशनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहिल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.
8. आपल्या उत्तर-पत्रिकांवर प्रश्न-पत्रिकेची कोड संख्या **70/S/O/M,** सेट A लिहावेत.



**UNNATI EDUCATION**
**9899-436-384: 9654-279-279**

## MARATHI

## (मराठी)

## (204)

**वेळ : तीन तास ]** **[ एकूण गुण : 100**

**निर्देश :** (i) या प्रश्नपत्रिकेत एकूण **37** प्रश्न आहेत आणि सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(ii) प्रश्नपत्रिकेत दोन विभाग आहेत. विभाग–**अ** आणि विभाग–**ब**

(iii) विभाग 'अ' मध्ये वस्तुनिष्ठ/बहुपर्यायी प्रश्न आहेत तर विभाग 'ब' मध्ये विषयनिष्ठ/वर्णनात्मक प्रश्न आहेत. विभाग **अ** – **50** गुण व विभाग **ब** – **50** गुण आहेत = **100** गुण

(iv) विभाग 'अ' मध्ये एकूण **27** प्रश्न आहेत.

- प्रश्न क्र. **1** ते **12** गद्य
- प्रश्न क्र. **13** ते **20** पद्य
- प्रश्न क्र. **21** ते **27** व्याकरण

(v) विभाग 'ब' मध्ये एकूण **28** ते **37** प्रश्न आहेत.

- प्रश्न क्र. **28** ते **30** गद्य–पद्य
- प्रश्न क्र. **31** ते **32** व्याकरण
- प्रश्न क्र. **33** ते **34** उताऱ्यावरील प्रश्न
- प्रश्न क्र. **35** ते **37** लेखन कौशल्यावर आधारित उदा. निबंधलेखन, पत्रलेखन व सारांशलेखन इ.

UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR



UNNATI EDUCATION
9899-436-384: 9654-279-279

## विभाग – अ (वस्तुनिष्ठ/बहुपर्यायी प्रश्न)

दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. लक्ष्मीबाई टिळकांचे मराठीतील गाजलेले पुस्तक कोणते ? **1**

   (अ) श्यामची आई  (ब) गणगोत

   (क) बनगरवाडी  (ड) स्मृतिचित्रे

2. इंग्रजांच्या अरेरावीच्या विरोधात जे बेत आखले गेले त्याचे अग्रणी कोण होते ? **1**

   (अ) माधव

   (ब) मुख्याध्यापक

   (क) केशव व त्याचे सवंगडी

   (ड) केशव

3. निबंधमालेतील पहिल्या निबंधाचे नाव काय होते ? **1**

   (अ) मराठी भाषेची स्थिती

   (ब) भाषा आणि चिंतन

   (क) भाषेची आजची स्थिति

   (ड) स्वदेश व स्वधर्म

4. चूक की बरोबर ते लिहा. **3**

   (1) दिलीप धारुरकर यांनी लिहिलेल्या पाठाचे नाव पर्वतशिखर आहे.

   (2) भारतात धर्मरक्षणाचे काम स्त्रियांनी केले नाही.

   (3) आधुनिक भारतातला अण्णा हे एक अद्भुत चमत्कार होते.



UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR
UNNATI EDUCATION
9899-436-384: 9654-279-279

5. रिकाम्या जागा भरा. **3**

(1) __________ नामू गवळी दिसत असे. चित्रातल्या मारुतीसारखा.

(2) बालपणी लेखकाला 'श्री' ही सरस्वतीच्या मंदिरातील __________ वाटली होती. दासी

(3) रेव्हरंड टिळकांनी __________ धर्म स्वीकारला. ख्रिस्ती

6. जोड्या लावा – पाठ आणि पाठाचे लेखक यांच्या जोड्या लावा. **4**

| **(पाठ) 'अ' गट** | **(लेखक) 'ब' गट** |
|---|---|
| झोप | आचार्य विनोबा भावे |
| तू तर माझ्याही | दिलीप धारुरकर |
| मातृशक्तीचे महत्त्व | लक्ष्मीबाई नारायण टिळक |
| पर्वतशिखर | द.मा. मिरासदार |

UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR

दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

7. आईच्या मनात मुलाबद्दल __________ आहे, म्हणून 'मी मुलाची काहीही सेवा केली नाही', असा रिपोर्ट आई देते. **2**

(अ) स्नेह व वात्सल्य

(ब) प्रेम व जिव्हाळा

(क) माया व शांतता

(ड) विश्वास व सहानुभूती

8. टिळकांच्या मते आपण मराठी भाषेचा स्वीकार केला, कारण.... **1**

(अ) ती इंग्रजीपेक्षा चांगली आहे.

(ब) मराठी भाषा आपल्याला आवडते.

(क) ती आपल्याला जन्माबरोबर प्राप्त झाली आहे.

(ड) मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या खूप आहे.



**UNNATI EDUCATION**
**9899-436-384: 9654-279-279**

9. लग्नानंतर नागूला दिवसा झोप लागत नसे, कारण.... **1**

(अ) त्याच्या मागे प्रपंच लागला होता.

(ब) घरात मुलांचा गोंधळ होता.

(क) त्याला व्यायामाला वेळ द्यायचा होता.

(ड) त्याची बायको त्याला झोपू द्यायची नाही.

10. भीष्माचार्यांना पटत नसूनही त्यांनी कौरवांची बाजू घेतली, कारण... **1**

(अ) ते कौरव-पांडवांचे आजोबा होते.

(ब) महाभारतातील श्रेष्ठ पुरुष होते.

(क) कौरवांकडे सत्ता आणि पैसा होता.

(ड) कौरवांचे पहिले सेनापती होते.

11. रेव्हरंड टिळक व लक्ष्मीबाई टिळक यांनी वाईला जायचे ठरवले, कारण.... **1**

(अ) वाई गाव जवळ होते.

(ब) रेल्वेने जाणे सोयीचे होते.

(क) टिळकांना वाईत राहणे आवडत असे.

(ड) दोघांनी मुलांच्या तब्येतीचा विचार केला.

12. __________ महर्षी कर्वे यांना नको नको ते अपशब्द वापरले. **1**

(अ) सुशिक्षित लोकांनी

(ब) प्रवाहपतितांनी

(क) समाजकंटकांनी

(ड) दुष्टांनी



UNNATI EDUCATIONS
UNNATI KI AUR

UNNATI EDUCATION
9899-436-384: 9654-279-279

दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

13. कवी कुसुमाग्रज यांनी कोणाला प्रश्न विचारला ? **1**

(अ) आकाशाला

(ब) परमेश्वराला

(क) नक्षत्रांना

(ड) मुक्त प्रवाशाला

14. कुरुप बदकाला स्वतःची कोणती ओळख कळली ? **1**

(अ) सुंदर

(ब) राजहंस

(क) वेडे

(ड) वरीलपैकी एकही नाही

UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR

15. चूक की बरोबर ते लिहा. **3**

(1) 'तो सोन्याचा दिन' म्हणजे भारताच्या स्वातंत्र्याचा दिवस असे कवीला म्हणायचे आहे.

(2) दुंदुभी म्हणजे मंगलप्रसंगी वाजवले जाणारे वाद्य होय.

(3) या जन्मावर हजारदा प्रेम करावे असे कवीला वाटते.

16. रिकाम्या जागा भरा. **3**

(1) _______ जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।।

(2) आता सूर्यफुलासारखे _______ झालेच पाहिजे.

(3) परि तुम्ही _______ विश्वातील प्रवासी



UNNATI EDUCATION
9899-436-384: 9654-279-279

17. कविता आणि कवी यांच्या जोड्या लावा. **4**

| (कविता) 'अ' गट | (कवी) 'ब' गट |
|---|---|
| पहा टाकले पुसुनी डोळे | ग.दि. माडगूळकर |
| एका तळ्यात होती | मंगेश पाडगांवकर |
| या जगण्यावर | नामदेव ढसाळ |
| आता | शांता शेळके |

दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

18. वीरपत्नी रणांगणावर जाणाऱ्या पतीला कसा निरोप देणार आहे ? **1**

(अ) हसतमुखाने (ब) वियोगाने

(क) दु:खाने (ड) सुखाने

19. अवघे विश्व कशावर तरावे असे कवीला वाटते ? **1**

(अ) फुलांवर (ब) पिंपळपानावर

(क) झाडांवर (ड) वेलींवर

UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR

20. प्रत्येकजण पिलाशी कसा बोलत असे ? **1**

(अ) आनंदाने (ब) सवयीने

(क) टोचून (ड) धिक्काराने

दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

21. द्राक्षांचा __________ असे म्हणतात. **1**

(अ) थवा (ब) कळप

(क) गठ्ठा (ड) घोस



UNNATI EDUCATION
9899-436-384: 9654-279-279

22. सौरभने काकडी खाल्ली, या वाक्याचे अनेकवचनी रूप ओळखा. **1**

(अ) सौरभ काकडी खातो.

(ब) सौरभने काकड्या खाल्ल्या.

(क) सौरभ काकडी खात नाही.

(ड) सौरभ आंबे खातो.

23. चूक की बरोबर ते लिहा. **3**

(1) एकाच वाक्यात एकाच प्रकारचे दोन, तीन शब्द पाठोपाठ आल्यास त्यातील प्रत्येक शब्दानंतर पूर्णविराम देतात.

(2) दोन व्यक्तींमध्ये सम प्रमाणात स्थूल मानाने केलेले भाषण म्हणजे संभाषण होय.

(3) मी काल कामाला गेलो, या वाक्यातील गेलो हे अव्यय आहे.

UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR

24. दिलेल्या पर्यायांतून अचूक शुद्ध शब्द ओळखा. **3**

(1) (अ) तिमीर (ब) तिमिर

(क) तीमीर (ड) तीमर

(2) (अ) कूजबूज (ब) कुजबूज

(क) किजबूज (ड) कुजूबूज

(3) (अ) अनिश्चीत (ब) अन्नीश्चित

(क) अनीश्चित (ड) अनिश्चित



UNNATI EDUCATION
9899-436-384: 9654-279-279

25. दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. **3**

(1) मी पुस्तक वाचले. या वाक्यातील अधोरेखित शब्दास काय म्हणतात ?

(अ) केवलप्रयोगी अव्यय

(ब) सर्वनाम

(क) क्रियापद

(ड) विशेषण

(2) पासनापास, हे या द्‌वंद्‌व समासाचे उदाहरण आहे.

(अ) वैकल्पिक

(ब) समाहार

(क) इतरेतर

(ड) द्‌विगू

(3) जे अव्यय सर्वसाधारणपणे सर्व शब्दप्रकारांना जोडून येते व वाक्यातील शब्दांशी असलेला संबंध दाखवते त्याला काय म्हणतात ?

(अ) उभयान्वयी अव्यय

(ब) केवलप्रयोगी अव्यय

(क) शब्दयोगी अव्यय

(ड) यापैकी नाही

26. सूचनेप्रमाणे लिहा. **2**

पुढे दिलेल्या शब्दसमूहाला एक शब्द सुचवा.

(अ) शंभर वर्षे आयुष्य जगणारा.

(ब) विक्री करणारा



UNNATI EDUCATIONS EK KADAM UNNATI KI AUR

**UNNATI EDUCATION**
**9899-436-384: 9654-279-279**

27. खालील शब्दांच्या विरुद्धार्थी शब्दांत जोड्या जुळवा. **2**

| | |
|---|---|
| (अ) आदर | (अ) अनुत्तीर्ण |
| (ब) स्तुती | (ब) नास्तिक |
| (क) उत्तीर्ण | (क) निंदा |
| (ड) आस्तिक | (ड) अनादर |

### विभाग – ब (विषयनिष्ठ/वर्णनात्मक प्रश्न)

28. खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे **20** ते **30** शब्दांत लिहा. **6**

(अ) लक्ष्मीबाई टिळकांची व्यवहारात वागण्याची तत्त्वे कोणती होती ?

(ब) शास्त्रात आईचा गौरव कोणत्या शब्दांत केला आहे ?

(क) कोणत्या गोष्टी लेखक वि.स.खांडेकर यांना आनंद देतात ?

(ड) खाऊचा पुडा केशवने कचराकुंडीत का टाकून दिला ?

29. खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे **20** ते **30** शब्दांत लिहा. **6**

(अ) कवयित्री या देशाच्या मातीची महती कशी सांगत आहे ?

(ब) वेलीवर उमलणारे फूल कवीला कविता असे का वाटते ?

(क) कवीने पिल्लाच्या दु:खाचे वर्णन कसे केले आहे ?

(ड) ज्ञानेश्वरांनी 'विश्वात्मके' हे विशेषण का व कुणासाठी वापरले आहे ?

30. खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे **30** ते **50** शब्दांत लिहा. **9**

(अ) सकाळी उठल्यावर चोराबद्दल नागू बायकोला काय म्हणला ?

(ब) महात्मा फुले यांनी शेतकऱ्याचे चित्र कसे रेखाटले आहे ?

(क) सूर्याकडे पाठ फिरवून शतकांचा प्रवास कुणी व कसा केला ?

(ड) कवी नक्षत्रांना कोणता प्रश्न विचारतो ?



UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR
UNNATI EDUCATION
9899-436-384: 9654-279-279

31. (1) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. **2**

(अ) पक्ष्यांचा ..........

(ब) पुस्तकांचा ..........

**किंवा**

'खडे फोडणे' या वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

(2) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. **2**

(अ) रस्ता ............

(ब) बातमी ............

(क) दगड ............

(ड) जमीन ............

UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AOR

32. कंसातील सूचनेनुसार प्रश्न सोडवा.

(1) (अ) आकाश निरभ्र आहे. **2**

(या वाक्यातील नाम शोधून लिहा.)

(ब) एखाद्या विषयाचे वर्णन करून झाल्यानंतर ती गोष्ट पटवून देण्यासाठी त्याच अर्थाचा एखादा दाखला किंवा उदाहरण दिल्यास ________ अलंकार होतो.

**किंवा**

तिने विचारले, "साहेब कोठे आहेत ?" मी म्हणाले, "ते बाहेर गेले आहेत."

(या वाक्यात वापरलेली विरामचिन्हे ओळखा.)

(2) खालील वाक्यातील काळ ओळखा. **2**

(अ) भारतात धर्मरक्षणाचे काम स्त्रियांनी अधिक केले आहे.

(ब) मी उद्या मैदानावर खेळायला जाणार.



UNNATI EDUCATION
9899-436-384: 9654-279-279

33. खालील उतारा वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा.

एका टेकडीवर खूप उंचीवर माझी खोली होती. विपुल नैसर्गिक सौंदर्याने नटलेला तो परिसर होता. खारी, साप, निरनिराळ्या प्रकारचे विंचू हे माझ्या खोलीत नेहमी यायचे. विविध रंगाची फुलपाखरे आणि विविध तऱ्हांचे पक्षी हे माझे तेथील सोबती बनले. माझ्याविषयी एक प्रकारची आत्मीयता त्यांना वाटत असावी, असे दिसते. नेहमी दूर राहूनच ते आपल्या सुंदर सहवासाचा आनंद मला देत. अशा शुद्ध, सात्त्विक वातावरणात साहजिकच मी आध्यात्मिक क्षेत्राकडे वळलो. दररोज केवळ एक वेळ भाजी व भात एवढा स्वयंपाक आणि अर्धा तास टकळीवर सूत कातण्यात जेवढा वेळ जाईल तेवढा वेळ वजा जाता सर्व वेळ मी चिंतनात, ध्यानमग्न अवस्थेत घालवू लागलो. या दृष्टीने पंधरा महिन्यांचे माझे तेथील वास्तव्य मला अत्यंत लाभदायी ठरले. तो सर्व काळ उपवास, प्रार्थना, ध्यान इ. साधनेत घालविला. तेथेच मी उपनिषदांचे वाचन केले. या स्थानबद्धतेच्या काळातच मी उर्दू शिकायला आरंभ केला. 'अलीफबे' पासून प्रारंभ करून मी सात क्रमिक पुस्तके संपविली. बाहेरच्या जगाचा जवळजवळ मला विसरच पडला होता.

स्वामी रामानंद तीर्थ

(1) स्थानबद्धतेच्या काळात स्वामी रामानंद तीर्थ यांचे सोबती कोण होते ? **1**

EK KADAM UNNATI KI AUR

**किंवा**

कोणत्या वातावरणामुळे स्वामी रामानंद तीर्थ आध्यात्मिक क्षेत्राकडे वळले ?

(2) स्वामी रामानंद तीर्थ हे आपला जास्तीत जास्त वेळ कशात घालवत ? **1**

**किंवा**

पंधरा महिन्यांचे वास्तव्य लाभदायी ठरले, असे स्वामी रामानंद तीर्थ का म्हणतात ?

(3) स्वामी रामानंद तीर्थ यांनी कोणत्या ग्रंथांचे वाचन केले ? **1**



UNNATI EDUCATION
9899-436-384: 9654-279-279

34. खालील पद्यांश वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा. **3**

एकच शत्रू असे आपला
काढू पिटुन मिळुन तयाला
त्याच्याशिवाय शत्रूच नाही
शोधूनि काढा मनात पाही
शोधला का
पाहिला का
विचार करुनी सांग लेकरा
नाव तयाचे बोल भरभरा
हरलास का
कबूलच का
सांगते पहा दुष्ट शत्रुचे
नाव नीट रे ऐक तयाचे
अज्ञान
धरुनि त्याला पिटायाचे
आपल्यामधुनि हुसकायाचे

**सावित्रीभाई फुले**

(1) शत्रूला दूर करण्यासाठी काय करावे असे सावित्रीबाई फुले सांगतात ?

**किंवा**

सावित्रीबाई फुले त्याला दुष्ट शत्रू का म्हणतात ?



UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR
UNNATI EDUCATION
9899-436-384: 9654-279-279

(2) सावित्रीभाई फुले यांनी लेकरा कोणाला म्हटले आहे ?

**किंवा**

दुष्ट शत्रूने कोठे स्थान पटकावले आहे ?

(3) दुष्ट शत्रूचा नाश कसा करता येईल ?

35. खालील उतारा वाचून स्वतःच्या भाषेत त्याचे एक तृतीयांश शब्दांत सारांशलेखन करा व उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. **4**

स्मरणशक्तीचे अनेक दाखले विचारात घेऊन मानसशास्त्रज्ञ उत्तम स्मरणशक्तीची लक्षणे शोधतात. अनुभव संस्कार मनाच्या पाटीवर उमटणे, ते पुसले न जाता टिकून राहाणे, गरजेप्रमाणे त्यांची पुनरावृत्ती करता येणे, अशा काही घटकप्रक्रिया स्मरणात अंतर्भूत असतात. वाचन किंवा जलद गतीने अवधानपूर्वक व अचूकतेने करता येणे हे चांगल्या स्मरणशक्तीचे एक अंग किंवा लक्षण मानले जाते. अशा अनुभवाने मनावर उमटणारे संस्कार दीर्घ काळ सुस्पष्ट राहाणे हे पण महत्त्वाचे अंग होय. जेव्हा गरज पडेल तेव्हा लगोलग आठवता येणे हा त्या पुढचा भाग ठरतो. अनेक विद्यार्थ्यांना परीक्षा संपल्यावर आठवू लागते. कितीतरी प्रौढांना आठवण्यासाठी बरेच सायास पडतात. उत्तम स्मरणाचे आणखी एक गमक म्हणजे प्रसंगसापेक्षता हे होय. विशिष्ट संदर्भात जे आवश्यक ते आठवले पाहिजे. नको ते आणि नको तेव्हा आठवणे हे निरर्थक स्मरण म्हणावे लागेल.

UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR

36. आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांना पुस्तक प्रदर्शन पाहावयास न्यायचे आहे. त्यासाठी दोन बस एक दिवसासाठी हव्या आहेत. तरी बस डेपो व्यवस्थापकांना पत्र लिहा. **5**

**किंवा**

तुमच्या भावाला आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळाडूचा करंडक मिळाला आहे. त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.



**UNNATI EDUCATION**
**9899-436-384: 9654-279-279**

37. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर **150** ते **200** शब्दांत निबंध लिहा. **6**

(1) माझा आवडता प्राणी

(2) लाल किल्ला बोलू लागला तर…

(3) रस्त्यावरची रहदारी आणि आव्हाने

(4) मोबाईलचे (भ्रमणध्वनीचे) मनोगत

---

UNNATI
EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR



**UNNATI EDUCATION**
**9899-436-384: 9654-279-279**

UNNATI
EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR



UNNATI EDUCATION
9899-436-384: 9654-279-279